९०

# २७ फेब्रुवारी

# कुसुमाग्रज जयंती

# मराठी राजभाषा दिन

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

1280


# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**Web :** www.dhepune .gov. in **E-Mail :**mavi. dhepune@gov.in

**फोन नं.**020/26122119,26051512,26130627,26124639 **फॅक्स नं.** 020/26111153.


क्र.: उशिसं/२७ फेब्रु.-म. भा. गौ.दिन/मवि-१/२०२२/१६३६ दिनांक: .२.२०२२

VIVEKANAND COLLEGE INWARD No. 1585 Date- 23.2.2022 KOLHAPUR

22 FEB 2022

**परिपत्रक**

**वाचा- मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्र.: मभादि-२०२२/प्र.क्र.९/भाषा-३ दि. १६.२.२०२२**

कविवार्य वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. म्हणूनच वि.वा. शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याबाबतच्या सूचना, मराठी भाषा विभागाच्या दि. २१ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख यांना **रविवार दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक मराठी भाषा गौरव दिन सोहळा साजरा करण्याबाबत** संदर्भांकित शासन परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे.

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. मराठी भाषा गौरव दिनासाठी, सदर धोरणाशी सुसंगत अशी "मराठी भाषा विभागाची वाटचाल व प्रगती" ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. तसेच मराठी भाषा गौरव दिन सुयोग्य कार्यक्रम आयोजित करुन समारंभपुर्वक साजरा करण्यासाठी शासन परिपत्रक क्र.: मभादि-२०२२/प्र.क्र.९/भाषा-३ दि. १६.२.२०२२ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. (प्रत संलग्न)

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालये, सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित, मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था यांनी संदर्भांकित शासन परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी, मराठी भाषा गौरव दिनाचे समारंभ/सोहळा आयोजित करावा.

प्रा. भाऊ गोसावी

VIVEKANAND COLLEGE ESTB. JUNE 1964 KOLHAPUR-416003

23/2/2022 23.2.22

ज्येष्ठ कवी वि.वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## मराठी भाषा विभाग
### शासन परिपत्रक क्रमांकः मभादि-२०२२/प्र.क्र.९/भाषा-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक: १६ फेब्रुवारी, २०२२.**

**वाचा :-** मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दि.२१.०१.२०१३.

**प्रस्तावना :-**

वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना यापूर्वी दिनांक २१ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख यांना रविवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२२ रोजी पुढील विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक "मराठी भाषा गौरव दिन" सोहळा साजरा करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

२. "मराठी भाषा गौरव दिन" हा कार्यक्रम मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या मुख्य धोरणास अनुसरून "मराठी वाचन प्रेरणा दिन" व "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" या अन्य मराठी भाषा प्रचार प्रसार कार्यक्रमाबरोबर साजरा करण्यात येत असला तरी सध्याच्या कोविड १९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने साजरे करण्याच्या सूचना यापूर्वी देण्यात आल्या आहेत. (जिथे प्रत्यक्षरित्या कार्यक्रम करणे शक्य आहे, तिथे केंद्र शासन / राज्य शासन यांनी आखून दिलेल्या कोविड मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.)

३. मराठी भाषेचा प्रचार / प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. सदर धोरणाशी सुसंगत पारंपारिक पद्धतीने प्रचार / प्रसार करण्याबरोबर त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन विविध माध्यमांचा वापर करुन मराठी भाषेचा प्रचार / प्रसार विषयक खालील प्रमाणे कार्यक्रम

कार्यशाळांचे वेळापत्रक जाहीर करावे. त्यानुसार कार्यक्रम आयोजित करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

७) मराठी भाषेचा प्रचार / प्रसार ऑनलाईन पद्धतीने प्रभावीपणे कसा करता येईल या विषयावरील राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या संस्थांनी तज्ज्ञांच्या मदतीने ऑनलाइन कार्यशाळा आयोजित कराव्यात.

८) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत.

९) मातृभाषेची महती आणि माहिती तसेच, मातृभाषेचे व्यक्तिगत व समाज जीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित करावे.

१०) सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर कार्यक्रम आयोजित करावे.

११) न्यायव्यवहार, शासन प्रशासन, प्रसार माध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे तसेच, मराठी भाषेतून न्यायदान देण्याच्या कामास गती मिळावी यादृष्टीने विधी महाविद्यालयांनी "मराठी अभिमत न्यायालय" (Marathi Moot Court) च्या स्पर्धांचे आधुनिक माध्यमांचा वापर करून आयोजन करावे.

१२) आकाशवाणी व दूरदर्शनवरुन सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये मराठी भाषाविषयक मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करावेत.

१३) मराठी भाषा / साहित्य / कोश वाङमय या विषयांवर ऑनलाईन व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन तसेच तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात यावे.

२६) मराठी भाषा विभागाची विविध संकेतस्थळे, क्षेत्रिय कार्यालयांची संकेतस्थळे, भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) याबाबतची माहिती सर्वसामान्यांना व्हावी या दृष्टीने सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी विविध माध्यमातून याबाबतची माहिती प्रसारित करावी.

२७) वरील कार्यक्रम सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी खालीलप्रमाणे साहित्य संस्थांची मदत घेऊन त्या साहित्य संस्थांसमोर दर्शविलेल्या जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मदत घ्यावी.

| अ.क्र. | साहित्य संस्था | साहित्य संस्थेच्या अंतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर. |
| २. | मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर. |
| ३. | विदर्भ साहित्य संघ, नागपूर | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ४. | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर. |
| ५. | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर | कोल्हापूर |
| ६. | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. | मुंबई शहर |

सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच **अ.क्र.२७** येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

Jr. College Recog. No. H.S.C./1074/R-1/DT : 8-8-1976
Jr. College Code No. 23-09-002
Jr. College U.Dise No. 27341301006

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार''
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Estd. : June 1964

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे



# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

२१३०, ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत
नॅक मानांकन : 'A' (सी.जी.पी.ए. ३.२४)
कॉलेज उईथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स, यु.जी.सी., न्यु दिल्ली
स्टार कॉलेज - डी.बी.टी. - भारत सरकार
आय.एस.ओ. ९००१:२०१५

(स्वायत्त) कोल्हापूर

Ph. : 0231-2658612, 2658840 | Fax : 0231-2658840 | Resi. : 0231-2653962 | Website : www.vivekanandcollege.org | E-mail : info@vivekanandcollege.org

| संस्थापक | अध्यक्ष | कार्याध्यक्ष | सचिव | प्राचार्य |
|---|---|---|---|---|
| डॉ. बापूजी साळुंखे D. Lit. | मा. आमदार चंद्रकांत दादा पाटील MLA | प्राचार्य अभयकुमार साळुंखे M.A. | प्राचार्या सौ. शुभांगी गावडे M.Sc., B.Ed. | डॉ. आर. आर. कुंभार M.Sc. M.Phil. Ph.D. |

जावक क्रमांक व्हि.सी.के. / 1989/2021-22 दिनांक : 28/2/2022

प्रति,
मा. संचालक
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
मध्यवर्ती इमारत , पुणे ४११००१

विषय : मराठी राजभाषा गौरव दिन अहवाल
संदर्भ : जा.क्र.उशिसं/२७ फेब्रु-म.भा.गौ.दिन/मवि-१/२०२२/१६३६ दि.२२.०२.२०२२

महोदय,

वरील विषयी व संदर्भीय परिपत्रकानुसार या महाविद्यालयात दिनांक २७.०२.२०२२ रोजी मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. सोबत या कार्यक्रमाचा अहवाल, बातमी व फोटो mavi.dhepune@gov.in या मेलवर पाठवित आहे. कृपया स्वीकार व्हावा ही विनंती.


कळावे,

आपला विश्वासू,

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

प्रत माहितीसाठी :-
मा. विभागीय सहसंचालक
(उच्च शिक्षण),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

G:All Jt.Dir/Med let



"Education for Knowledge, Science, and Culture"
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

KOLHAPUR (AUTONOMOUS)

**2021-22**

*Report: Marathi Rajabhasha Din – A Guest Lecture*

1. **Name of Department** : **Marathi**
2. **Name of Organized Activity** : A Guest **Lecture of Dr. D. A. Desai**
3. **Date/ Duration** : 28/02/2022
4. **Aims and Objectives** :
   1. To pay tribute to Kusumagraj on the occasion of his birth anniversary
   2. To introduce the literature of Kusumagraj.
   3. To discuss Marathi language, literature and culture on the occasion of Marathi Language Day.
5. **No. of beneficiaries** : **Total = 18**

| | | |
|---|---|---|
| Teachers | Male | 03 |
| Students | Male | 03 |
| | Female | 12 |

6. **Expenditure & funding agency** : Nil
7. **Brief description** : Kavi Kusumagraj Jayanti, 'Marathi Rajbhasha Din' was celebrated jointly by Vivekananda College, Kolhapur's Marathi Department and Library Department. On this occasion, former head of Marathi department Dr. D. A. Desai delivered a guest lecture. At this time the library assistant Shri. Hitendra Salunkhe was present. An exhibition of Kusumagraj's literary works was organized at the library.
8. **Outcomes** :
   1. Students were introduced to Kusumagraj's literature.
   2. The importance of Marathi Official Language Day was emphacised. Students were also introduced to Marathi literature and culture.
9. **Photos** : Enclosed
10. **Signatures of coordinator/ organizer:** Dr. Pradip Yashwant Patil

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR-416003 ESTD. JUNE 1964

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## सूचना

### मराठी विभाग व ग्रंथालय विभाग

N.B.No.:1122/२०२२-२३ दिनांक: २२.०२.२०२२

---

## कवी कुसुमाग्रज जयंती मराठी राजभाषा दिन (२७ फेब्रूवारी,२०२२)

मराठी विभाग व ग्रंथालय विभागाच्यावतीने सोमवार दिनांक २८ फेब्रूवारी २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता ग्रंथालयामध्ये कवी कुसुमाग्रज जयंती, मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात येत आहे. यावेळी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा जानेवारी २०२२ मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये भाग घेऊन यश प्राप्त केलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रमाणपत्र व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात येत आहे. तरी स्पर्धेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमास उपस्थित राहावयाचे आहे. या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येत आहे. स्पर्धेचे निकालपत्रक काचफलकात लावलेले आहे.

VIVEKANAND COLLEGE ESTB. JUNE 1964 KOLHAPUR-416003

डॉ.आर.आर.कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर, संचालित

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर(स्वायत्त)

## कुसुमाग्रज जयंती
## मराठी राजभाषा दिन

२८ फेब्रुवारी २०२२

ग्रंथालय

सकाळी – १०.३० वा.

## कार्यक्रमपत्रिका

- प्रतिमापूजन : मान्यवरांच्या हस्ते
- संस्थाप्रार्थना : कॅसेटद्वारे
- प्रास्ताविक व स्वागत : डॉ. नीता पाटील
- विद्यार्थी सत्कार : मान्यवरांच्या हस्ते
- पाहुण्यांचा परिचय : प्रा. बी. के. गोसावी
- प्रमुख पाहुणे मनोगत : डॉ. डी. ए. देसाई (माजी विभागप्रमुख)
- अध्यक्षीय मनोगत : डॉ. आर. आर. कुंभार
  प्राचार्य, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
- आभार : डॉ. प्रदीप पाटील
- सूत्रसंचालन : डॉ. स्वप्निल बुचडे

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 ★ KOLHAPUR-416003 ★

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था, कोल्हापूर, संचालित


विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर(स्वायत्त)

-------------------- मराठीविभाग -----------------------


२७ फेब्रुवारी कविवर्य वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस

मराठी राजभाषा दिन

२७ फेब्रुवारी २०२१




कार्यक्रमाचे रोपट्याला पाणी घालून उद्घाटन करताना मान्यवर



मराठी राजभाषा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

कोल्हापूर

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे**

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
## मराठी विभाग आयोजित
## मराठी राजभाषा गौरव दिन दि.२७.०२.२०२२

## अहवाल

## विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी राजभाषा दिन साजरा

मराठी भाषेचे वैभव टिकवायचे असेल तर शिक्षण क्षेत्राबरोबरच विविध सामाजिक, सांस्कृतिक व कलाविषयक जाणिवांचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करणे गरजेचे आहे. मोबाईल, संगणकाच्या वापराबरोबरच लेखकांने लिहिलेले साहित्यहीआवर्जुन वाचले पाहिजे. आज जग बदलते आहे. त्यामुळे वाचन समृध्दीमुळेच विविध क्षेत्रामध्ये काम करण्याची संधी प्राप्त् होत आहे. मराठी भाषा, साहित्् व संस्कृती याविषयीची जाण समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकात्म् भावनेने मराठीचा अभिमान बाळगून भाषेचा वापर केला पाहिजे. असे विचार मराठी साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. डी.ए.देसाई यांनी मांडले. ते कुसुमाग्रज जयंतीच्या निमित्ताने मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी राजभाषा दिन कार्यक्रमाच्या प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथपाल श्री. हितेंद्र साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगतात श्री. हितेंद्र साळुंखे यांनी वि.वा.शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या साहित्याचा आढावा घेत मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त होण्यासाठीची भावना व्यक्त केले. याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा.बी.के.गोसावी यांनी केले. आभार डॉ. प्रदीप पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. स्वप्निल बुचडे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

## "तंत्रज्ञानाच्या युगात साहित्य आणि सामाजिक भान आवश्यक"
- प्रा. डॉ. डी. ए. देसाई , ज्येष्ठ विचारवंत

### विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी राजभाषा दिन साजरा

कोल्हापूर दि. 28: मराठी भाषेचे वैभव टिकवायचे असेल तर शिक्षण क्षेत्राबरोबरच विविध सामाजिक, सांस्कृतिक व कलाविषयक जाणिवांचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करणे गरजेचे आहे. मोबाईल, संगणकाच्या वापराबरोबरच लेखकांने लिहिलेले साहित्यहीआवर्जुन वाचले पाहिजे. आज जग बदलते आहे. त्यामुळे वाचन समृध्दीमुळेच विविध क्षेत्रामध्ये काम करण्याची संधी प्राप्त् होत आहे. मराठी भाषा, साहित्य् व संस्कृती याविषयीची जाण समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकात्म् भावनेने मराठीचा अभिमान बाळगून भाषेचा वापर केला पाहिजे. असे विचार मराठी साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. डी.ए.देसाई यांनी मांडले. ते कुसुमाग्रज जयंतीच्या निमित्ताने मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी राजभाषा दिन कार्यक्रमाच्या प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथपाल श्री. हितेंद्र साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगतात श्री. हितेंद्र साळुंखे यांनी वि.वा.शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या साहित्याचा आढावा घेत मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त् होण्यासाठीची भावना व्यक्त केले. याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा.बी.के.गोसावी यांनी केले. आभार डॉ. प्रदीप पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. स्वप्निल बुचडे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक उपस्थित होते.

---

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत)**

जा.क्र.व्हीसीके/ मेलव्दारे/-2021-22 दि.28.2.2022

प्रति,
मा. संपादकसो,
दैनिक ----------------- कोल्हापूर.

महोदय,
वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिद्ध करुन सहकार्य करावे ही विनंती.
कळावे,

आपला विश्वासू,

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर.